**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या गुरुवार दि. २८ जलै २०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२९ वी बैठक बुधवार दि.२८ जुलै २०१० रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री.. सुभाष हजारे,भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा.श्री.प्रकाश पाठक | उप सचिव/गृहनिर्माण विभाग |
| ३) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ६) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ७) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ८) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ९) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| १०) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| ११) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १३) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १४) | मा.श्री.तारीक फारुकी | सदस्य |
| १५) | मा.श्री.हेमराज शाह | सदस्य |
| १६) | उपकर निर्धारक व संकलक/म.न.पा. | निमंत्रक |
| १७) | कार्य.अभियंता (इ.प्रस्ताव) शहर/ म.न.पा. | निमंत्रक |
| १८) | श्री.पी.पी.महिषी,<br>निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |
| १९) | श्री.ओ.बी.साहू | सह मुख्य अधिकारी |
| २०) | डॉ.श्री.पुलकुंडवार | कार्यासन अधिकारी |

मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव श्री.महिषी यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १२९.१**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.२४/०६/२०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.०१ ते ०९ वर सादर करण्यात आले.

सचिव यांनी मागील बैठकीत मा. सदस्यांनी विचारलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यपूर्ती अहवालाबाबत माहिती देताना असे सांगितले की, मा. सदस्यांच्या सूचनांप्रमाणे एम.आय.जी.क्लबच्या सदस्यत्वाबद्दल मुंबई मंडळाकडे पाठपुरावा चालू आहे.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी बँकेमार्फत भाडेवसुलीचे पुढे काय झाले, अशी विचारणा केली असता मुख्य लेखा अधिकारी यांनी बँकेमार्फत भाडेवसुली करण्याबाबतच्या प्रस्तावाला बँकेने मान्यता दिल्याचे पत्र प्राप्त झालेले आहे. तरी एक महिन्यात भाडे वसुलीचे काम सुरु होईल, असे सांगितले.

तसेच मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी जर एखादा भाडेकरु वर्षभराचे भाडे भरत असेल तर, त्याला त्यात काहीतरी सुट देण्यात यावी, असे सूचविले. त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.ढोले, उपमुख्य अभियंता (परिमडळ-१) यांना इतर ठिकाणी जसे महानगरपालिका, बेस्ट येथे अशी सवलत दिली जाते का, दिली जात असल्यास खात्री करुन या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यास सांगितले.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी दोन वेगवेगळया ठिकाणी असलेल्या गाळयांबाबतच्या मुद्याबाबत विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, हया बाबत मार्गदर्शक तत्वे शासनाच्या विचाराधीन असून याबाबत शासन निर्णय लवकरच अपेक्षित आहे.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी मागील बैठकीत कम्युनिटी हॉल उपलबध होणेबाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता, एसआरडी/मुंबई मंडळातील संबंधित कार्यकारी अभियंत्यांना बोलावून कुर्ला येथील स्वॉनमिल व न्युहिंद मिल यांच्या जमीनीवर बांधण्यात येत असलेल्या संक्रमण शिबीर इमारतीच्या तळ मजल्यावर प्रत्येकी एक याप्रमाणे दोन कम्युनिटी हॉल बांधण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या मुख्य अधिकारी यांनी सूचना दिल्या.

मा.सदस्य श्री. किसन जाधव, यांनी श्री.पार्टे यांचेसंदर्भात बृहत्सूचीबाबत पुन्हा मुद्दा उपस्थित केला असता सहमुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर इमारत व त्यामधील रहिवाशांची खात्री करुन सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करुन लवकरात-लवकर शासनास सादर करुन शासन मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी मागिल बैठकीत उपस्थित केलेल्या अनिवासी गाळया ऐवजी निवासी गाळा मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाने "प्रकरणनिहाय गुणवत्तेवर निर्णय घ्यावा" अशी अट टाकून मान्य केलेला आहे असे मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी व्हेकेशन नोटीसबाबत कोणती कार्यवाही करण्यांत आली याबाबत विचारणा केली असता व्हेकेशन नोटीस अंतिम करुन बुकलेट तयार करण्याचे काम सुरु असल्याचे सहमुख्य अधिकारी यांनी सांगितले.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी मागिल बैठकीत उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी साठी प्रस्ताव सादर करतेवेळी इमारतीचे क्रमांक बरोबर इमारतींची नावेही नमूद करावी, असा जो मुद्दा उपस्थित केला होता त्याप्रमाणे इमारतींची नावे नमूद केलेली नाहीत असे सांगितले. त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी पुढील बैठकीत ज्या इमारतींची रेकॉडमध्ये नांवे उपलब्ध आहेत, ती यापुढे दर्शविण्यांत यावीत अशा बैठकीत उपस्थित अधिका-यांना सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी उमरखाडी येथील साईकृपा , ओमकार अशा ज्या पीएमजीपी तर्फे पुनर्रचित झालेल्या इमारतींबाबत मागिल बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, पीएमजीपी च्या इमारती जुन्या झालेल्या असल्यामुळे त्या ठिकाणी नवीन इमारती बांधण्याबाबत क्लस्टर डेव्हलपमेंन्ट ३३ ( ९) खाली अथवा प्रस्तावित ३३ (७) च्या संयुक्त पुनर्विकासाच्या धोरणानुसार कार्यवाही करता येईल. यावर मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी त्याचा पाठपुरावा करावा असे सांगितले.

सर्व सदस्यांनी मा.मुख्य अधिकारी यांचे असे निदर्शनास आणले की, त्यांनी ज्या प्रमाणे धारावी येथील संक्रमण शिबिराची पहाणी केली, त्या प्रमाणे अन्य संक्रमण शिबीरांची त्यांना पहाणी करावयाची आहे. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सर्व सदस्यांनी तारीख व वेळ ठरवून संबंधित उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना कळवावी. त्याप्रमाणे संबंधित उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता हे संक्रमण शिबीराची पहाणी करतेवेळी आपणांबरोबर येतील.

या नंतर सर्व सदस्यांनी मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती व पुनर्रचनेकरीता शासनाकडून देण्यात येणा-या अंशदानात वाढ करणेबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे सभागृहास माहिती दिली. " रु.2000/- प्रती चौ.मी. हा वाढीव खर्च विचारात घेता सदर अंशदानात अंदाजे 115 कोटीची वाढ होणे अपेक्षित आहे. म्हाडा, मुंबई महानगरपालिका व शासन यांचेकडून दिल्या जात असलेल्या अनुदानात जर दीड पटीने वाढ केल्यास म्हणजेच म्हाडा व मुंबई महानगरपालिका देय अंशदान प्रत्येकी 10 कोटीऐवजी 25 कोटी होईल व शासन देय अंशदान 40 कोटीऐवजी 100 कोटी होईल. सदर प्रस्ताव मान्य झाल्यास मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सन 2010-11 पासून उपकराच्या माध्यमातून 40 कोटी, म्हाडा अंशदान 25 कोटी, मुंबई महानगरपालिका अंशदान 25 कोटी व शासन देय अंशदान 100 कोटी असा एकूण निधी 100 कोटीऐवजी 190 कोटी उपलब्ध होईल. सदर प्रस्ताव मान्य झाल्यास जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारती सुधारित प्रचलित मर्यादेत दुरुस्त करता येतील व इमारती पडून होणारी जिवित व वित्त हानी टाळता येईल."

तसेच मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.आर.एम.सागर यांची प्रतिनियुक्तीने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळात उपमुख्य अधिकारी (सहकार कक्ष) या पदावर नियुक्ती झाली असल्याचे सभागृहास सांगितले.

वरील सविस्तर चर्चेअंती मा.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती करण्याची नोंद घेवून कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - १२९.२**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-१ मधील (अ,ब,सी-१/२/३ विभाग) ०७ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ११ ते १७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/१०९७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०७ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.८९,६०,९८५/-(रुपये एकोणनव्वद लक्ष साठ हजार, नऊशे पंच्याऐंशी फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४९,५०,७९०/- (रुपये एकोणपन्नास लक्ष पन्नास हजार, सातशे नव्वद फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली. मुळ वितरीत केलेल्या विषयसूचीतील पृष्ठ क्र.१८ येथे सी-२ विभागाचा ५ खंडेराव वाडी या इमारतीचा तपशिल चुकून वितरीत झाला असून, त्याच्या जागी नव्याने वितरीत केलेल्या सी-३ विभागाचा १३-१३ए भाई जीवनवाडी या इमारतीचा तपशिल ग्राहय धरण्यात यावा.

**बाब क्रमांक - १२९.३**

विषय - प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेत सुधारणा करणे.
(इ.क्र.२१-सी, ३री पोफळवाडी, सी-२ विभाग)

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/१०९८**

इ.क्र.२१-सी, ३री पोफळवाडी, सी-२ विभाग या इमारतीच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास मंडळाच्या दि.२८/०५/२००९ रोजी झालेल्या ११६ व्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या रु.१८,७७,७४८/- (रु.अठरा लक्ष, सत्याहत्तर हजार, सातशे अठ्ठेचाळीस फक्त) या प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेऐवजी सुधारित रु.२८,१३,८९९/- (अठ्ठावीस लक्ष, तेरा हजार, आठशे नव्याण्णव फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२९.४**

विषय - **पुनर्विकास**
मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१. अंतिम भूखंड क्र.५२४-टी.पी.एस.-४ - माहिम विभाग, इमारत क्र.१११-ए **'इंदीरा भवन' व 'जैन भवन'. ग-उत्तर विभाग**

२. भुकर पहाणी क्र.२८३/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.३५७ दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.११, **'शामजी लढ्ढा बिल्डिंग'. फ-उत्तर विभाग**

३. भुकर पहाणी क्र.१/८२३ गिरगाव विभाग इ.क्र.९ खेतवाडी ८वी गल्ली मुंबई येथील **'मुरली भगवान निवास'. डी-२ विभाग.**

४. भुकर पहाणी क्र.१०६६ भायखळा विभाग इ.क्र.७१-७५ टँक स्ट्रिट, नागपाडा **'लंबू महाराज की चाळ'. ई-२ विभाग.**

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. २१ ते ३५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०९९**

मुंबई बेटावरील खालील ४ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. अंतिम भूखंड क्र.५२४-टी.पी.एस.-४ - माहिम विभाग, इमारत क्र.१११-ए **'इंदीरा भवन' व 'जैन भवन'. ग-उत्तर विभाग**

२. भुकर पहाणी क्र.२८३/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.३५७ दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.११, **'शामजी लढ्ढा बिल्डिंग'. फ-उत्तर विभाग**

३. भुकर पहाणी क्र.१/८२३ गिरगाव विभाग इ.क्र.९ खेतवाडी ८वी गल्ली मुंबई येथील **'मुरली भगवान निवास'. डी-२ विभाग.**

४. भुकर पहाणी क्र.१०६६ भायखळा विभाग इ.क्र.७१-७५ टँक स्ट्रिट, नागपाडा **'लंबू महाराज की चाळ'. ई-२ विभाग.**

<u>आयत्यावेळेचे विषय</u>

**बाब क्रमांक - १२९.५ (१)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-१ मधील (अ,ब,सी-१/२/३ विभाग) २९ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ३७ ते ४५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/११००**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २९ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.९,३७,४७,६०४/-(रुपये नऊ कोटी,सदोतीस लक्ष,सत्तेचाळीस हजार, सहाशे चार फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४,९४,९६,८५६/- (रुपये चार कोटी, चौ-याण्णव लक्ष,शहाण्णव हजार, आठशे छप्पन्न फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १२९.५ (२)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग-दक्षिण) २२ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ४७ ते ५३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/११०१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.५,७८,७४,७७७/-(रुपये पाच कोटी,अठ्ठयाहत्तर लक्ष,सौत्र्याहत्तर हजार, सातशे सत्याहत्तर फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,६५,४४,२३६/- (रुपये तीन कोटी, पासष्ट लक्ष,चव्वेचाळीस हजार, दोनशे छत्तीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १२९.६**

विषय - उपमुख्य अभियंता परिमंडळ-२ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.५५ वर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/११०२**

उपमुख्य अभियंता परिमंडळ-२ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत मान्यता देण्यात आली.

**बाब क्रमांक - १२९.७**

विषय - इ.क्र.१४ व १६ वांका मोहल्ला, भूखंड क्र.६७२-६७३, भुलेश्वर विभाग, सी विभाग येथील पुनर्रचना योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/११०३**

इ.क्र.१४ व १६ वांका मोहल्ला, भूखंड क्र.६७२-६७३, भुलेश्वर विभाग, सी विभाग येथील पुनर्रचना योजनेस रु.८८,३४,३०४/- (अठ्ठयाऐंशी लक्ष, चौत्तीस हजार, तीनशे चार फक्त ) या रक्कमेस सर्वानुमते सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२९.८**

विषय - इमारत क्र.३८इ कापरेश्वर मार्ग सी-२ विभाग या इमारतीच्या दुरुस्तीसाठी मंजूर झालेल्या विशेष निधीच्या आदेश पत्रामध्ये इमारत क्र.३३-इ ऐवजी ३८-इ असा बदल होण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.५९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/११०४**

इमारत क्र.३८इ कापरेश्वर मार्ग सी-२ विभाग या इमारतीच्या दुरुस्तीसाठी मंजूर झालेल्या विशेष निधीच्या आदेश पत्रामध्ये इ. क्र.३३-इ ऐवजी ३८-इ असा बदल होण्याबाबत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२९.९**

विषय - इमारत क्र.अे.आर.पी.बिल्डिंग १, २ व ३ नौशीर भरुचा मार्ग डी विभाग, एस.क्र. १/२७८ ताडदेव विभाग नवीन चिखलवाडी, ताडदेव या इमारतीच्या सुधारीत प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.६१ ते ६३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/११०५**

इमारत क्र.अे.आर.पी.बिल्डिंग १, २ व ३ नौशीर भरुचा मार्ग डी विभाग, एस.क्र. १/२७८ ताडदेव विभाग नवीन चिखलवाडी, ताडदेव या इमारतीच्या पुनर्रचनेसाठी रुपये ७२५ लक्ष इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२९.१० (१)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-३ मधील (ई-१,ई-२,फ-दक्षिण) ३३ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६५ ते ७३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/११०६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ३३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.४,६६,६८,५२३/-(रुपये चार कोटी,सहासष्ट लक्ष,अडुसष्ट हजार, पाचशे तेवीस फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,४४,२०,२५५/- (रुपये दोन कोटी,

चव्वेचाळीस लक्ष,वीस हजार, दोनशे पंचावन्न फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १२९.१० (२)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-४ मधील (फ/उ व ग/उ विभाग) १३ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ७५ ते ७९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/११०७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,२४,१७,०९२/-(रुपये दोन कोटी,चोवीस लक्ष,सतरा हजार, ब्याण्णव फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,३८,५७,९९३/- (रुपये एक कोटी, अडतीस लक्ष,सत्तावन्न हजार, नऊशे त्र्याण्णव फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १२९.११**

विषय - इमारत क्र.३८ कामाठीपुरा ९ वी गल्ली, मुंबई ४००००८. म्हाड अधिनियम ८८(३) नुसार जारी केलेले प्रमाणपत्र मागे घेण्याबाबतचा प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ८१ ते ८३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२९/११०८**

इ.क्र.३८ कामाठीपुरा ९ वी गल्ली, मुंबई ४००००८ म्हाड अधिनियम ८८(३) नुसार जारी केलेले प्रमाणपत्र मागे घेण्याबाबतचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे. विषयांकीत मालमत्तेच्या संरचनात्मक दुरुस्तीचा प्रस्ताव स्वतंत्रपणे बाब क्र.१२९.१० (२) मध्ये मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला असून, त्यास ठराव क्र.१२९/११०७ अन्वये मंजूरी देण्यात येत आहे.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, काही काही वॉर्डमध्ये कर्मचारी वर्ग पुरेशा प्रमाणात नाही. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रत्येक वॉर्डमध्ये किती कर्मचारी वर्ग असावयास पाहिजे याचा उपमुख्य अभियंता (परिमंडळ १,२,३,४) यांनी प्रस्ताव तयार करुन तो सहमुख्य अधिकारी यांना द्यावा. त्याप्रमाणे आकृतीबंधात पद निर्मिती करता येईल.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी असाही मुद्दा उपस्थित केला की, त्यांनी पुनर्रचित इमारतीची पहाणी केली तेव्हा तेथील रहिवाशांचे निवासस्थानाचे फलक व्यवस्थीत नसल्याचे त्यांना आढळून आले. मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.पाटील, कार्यकारी अभियंता, डी-२ विभाग यांना पुनर्रचित इमारतींना भेट देऊन तेथील रहिवाशांचे निवासस्थानाचे फलक व्यवस्थीत आहेत किंवा नाहीत याची पहाणी करण्याच्या व ज्या इमारतींमध्ये फलक अद्याप लावले नाहीत त्या इमारतीत फलक लवकरात लवकर लावण्यात यावेत, अशा सूचना दिल्या.

तसेच सर्व सन्मा.सदस्यांना ओळख पत्र देण्याबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.महिषी, सचिव यांना सदर बाबतीत पाठपुरावा करावयाच्या सूचना दिल्या.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ